# ऋ ण नि र्दे श

"भैनाळ व बस्तान या कादंबऱ्यांत येणाऱ्या ग्रामीण जीवनाचे आकलन" हा लघुशोधप्रबंध पूर्ण करताना मला अनेकांचे सहकार्य लाभले. त्या सर्वांचे आभार मानणे माझे कर्तव्यच आहे. माझ्या या एम. फिल. प्रवासात मला माझे मार्गदर्शक डॉ. अनिल पांडुरंग गवळी तसेच त्यांच्या सुविद्य पत्नी यांचेही मोलाचे सहकार्य लाभले. तसेच शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर मराठी विभागप्रमुख डॉ. विश्वनाथ शिंदे सर, डॉ. कृष्णा किरवले सर, प्रा. हिंमाशू स्मार्त सर, डॉ. रणधीर शिंदे सर, डॉ. रवींद्र ठाकूर सर यांचे सहकार्य लाभले. त्याचबरोबर लेखक प्रा. डॉ. बाबुराव गुरव आणि प्रा. डॉ. मोहन पाटील या सर्वांनी मिळून वेळोवेळी केलेले मार्गदर्शन फलदायी ठरले, त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

या थोर गुरूंच्याबरोबरच काही मित्र परिवारांचाही यामध्ये मोलाचा सहभाग आहे. त्यामध्ये माझे मित्र कॉ. राजेंद्र अदाटे, संग्राम सावंत, फारूख गवंडी, कॉ. जोतराव, ॲड. कृष्णा पाटील, अनिल म्हमाने, अतुल वाघ, महावीर टायर्स रिमोल्डिंग मधील माझे सहकारी मित्र, संजीवनी अमृतसागर, सुनिता अमृतसागर, शोभा चाळके, सीमा मंडले, रूपाली कोळी यांनी वेळोवेळी केलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. शिवाजी विद्यापीठातील मित्रांचेही सहकार्य लाभले. चर्चा करत असताना संतोष काळे, सचिन औताडे, संतोष बोंगाळे, शरद माने-पाटील, सचिन रूपनर, सचिन धायगुडे, प्रकाश नाईक यांनी माझ्या मनात निर्माण झालेल्या प्रश्नांविषयीचे आपल्यापरीने उत्तरे देऊन मला सहकार्य केले. तसेच माझे मित्र व मैत्रिणी यांनी मी लघुशोधप्रबंधिकेविषयीचा अभ्यास करत असताना पूर्णत्वाविषयी आस्थेने चौकशी करून मला या कामी लिहिते केले. याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

या संशोधनाचे कार्य करत असताना माझे वेळोवेळी मनोबल वाढवण्याचे कार्य व धैर्य देणारी माझी आई श्रीमती शांता कोळी हिचाही मी शतशः ऋणी आहे की जिच्यामुळेच हे संशोधन करण्यास मला यश मिळाले. त्याचप्रमाणे माझ्या दोन बहिणी आणि त्यांचे पती सविता चव्हाण आणि संजय चव्हाण व वनिता मस्के आणि प्रकाश मस्के यांच्या सहकार्याबद्दलही मी त्यांचा ऋणी आहे. तसेच या लघुप्रबंधाचे टंकलेखन करून देणारे अधिक चाळके यांचाही मी आभारी आहे. अशा कित्येक ज्ञात-अज्ञात सहकारी, मित्र-मैत्रिणी परिवार व स्वकीय नातलग यांनी केलेल्या अनमोल सहकार्यामुळेच हा प्रबंध आज पूर्णत्वास आला. त्या सर्वांचा मी ऋणी आहे.

- समीर कोळी